MHAH220012972011

रे.मु.नं. ३३५/२०११
विठ्ठल राजाराम लबडे व इतर वि. राजाराम श्रीधर लबडे व इतर

आदेश
(नि.क्र.५० खाली)

प्रस्तुतचा अर्ज वादीतर्फे मयत प्रतिवादी क्र. ७ व नवनाथ किसन वडवकर यांचे वारस रेकॉर्डवर घेणेकामी व त्यानुशंगाने दाव्यात दुरुस्ती करणेसाठी दाखल केला आहे.

२. अर्ज व अर्जावरील म्हणणे वाचले. संपुर्ण अभिलेखाचे अवलोकन केले. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला.

३. अर्जदार/वादीचे थोडक्यात कथन असे आहे की, वादीने सदरचा दावा प्रतिवादीविरुध्द सरस निरस मानाने वाटप करुन पृथ्थक कब्जा मिळणेसाठी दाखल केलेला आहे. दाव्यातील प्रतिवादी क्र. ७ हे मयत झालेले आहेत. त्यांना त्यांना पुढीलप्रमाणे वारस आहेत ७अ. दादा किसन वडवकर, ७ब. नवनाथ किसन वडवकर सदर प्रतिवादी क्र. ७ब नवनाथ किसन वडवकर मयत झालेले असुन त्यांना पुढीलप्रमाणे वारस आहेत. ७ब१. सुषमा नवनाथ वडवकर, ७ब२. महेश नवनाथ वडवकर, ७ब३. वैभव नवनाथ वडवकर, ७ब४. वर्षा सागर काळाणे. वादीने पुढे असे कथन केले आहे की, सदर दाव्यातील प्रतिवादी क्र. ८ मारुती संभु वडवकर हे देखील मयत झालेले असुन त्यांना पुढील प्रमाणे वारस आहेत. ८अ. जाईबाई मारुती वडवकर, ८ब. आबासाहेब मारुती वडवकर, ८क. उमेश मारुती वडवकर, ८ड. आजिनाथ मारुती वडवकर, ८इ. संगीता नामदेव लबडे. वादीने पुढे असे कथन केले आहे की, सदर प्रतिवादी क्र. ८ चे वारस मुदतीत रेकॉर्डवर घेत आहेत. सदर अर्जावर प्रतिवादी क्र. १ ते ३ तर्फे आक्षेप नोंदवून असे कथन केले आहे की, मुळ दाव्यातील प्रतिवादींची नावे व अर्जातील नावामध्ये बदल असल्याने सदर अर्ज कायदेशीर नाही, त्यामुळे सदरचा अर्ज नामंजुर करण्यात यावा.

४. वादीने अभिलेखावर प्रतिवादी क्र. ७ किसन संभु वडवकर मयत झाल्याबाबत नि.क्र.५४ खाली ग्रामपंचायत टाकळी खंडेश्वरी यांचा मृत्युचा दाखला

दाखल केला आहे. तसेच प्रतिवादी क्र. ७ चा वारस मुलगा नवनाथ किसन वडवकर मयत झाल्याबाबत नि.क्र.५५ खाली ग्रामपंचायत टाकळी खंडेश्वरी यांचा मृत्युचा दाखला दाखल केला आहे. तसेच मयत प्रतिवादी क्र. ८ मारुती संभु वडवकर हे दि. २१/११/२०२५ रोजी मयत झाल्याबाबत ग्रामपंचायत टाकळी खंडेश्वरी यांचा मृत्युचा दाखला दाखल केला आहे. प्र.वादी यांनी अर्जास स्पष्टीकरणासह आक्षेप नोंदवला नाही व प्रतिवादी क्र. ७ किसन संभु वडवकर व त्यांचा मुलगा नवनाथ किसन वडवकर व प्रतिवादी क्र. ८ मारुती संभु वडवकर यांचा मृत्यु व त्यांचे अर्जात नमुद केलेले वारस नाकारलेले नाहीत. मयत प्रतिवादी ७, नवनाथ किसन वडवकर व प्रतिवादी क्र. ८ यांचे वारसदार अभिलेखावर घेण्याचे गरजेचे आहे. प्र.वादी यांनी अर्जास स्पष्टीकरणासह आक्षेप नोंदवला नाही. वादीने त्याच्या अर्जासोबत शपथपत्र दाखल केलेले आहे. मयत प्रतिवादी क्र. प्रतिवादी ७, नवनाथ किसन वडवकर यांचे वारस रेकॉर्डवर घेण्यास झालेला उशीरमाफीचा अर्ज मंजुर केलेला आहे. अर्ज, शपथपत्र, प्रतिवादीचे म्हणणे व दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला असता प्रथमदर्शनी असे दिसून येत आहे की, प्रतिवादी क्र. प्रतिवादी ७, नवनाथ किसन वडवकर व प्रतिवादी क्र. ८ हे मयत झाले असून सदर मयतास अर्जात नमुद केल्याप्रमाणे वारस असल्याचे दिसून येत आहे व सदर वारसदार यांना अभिलेखावर घेण्याचे गरजेचे आहे. म्हणून मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१) अर्ज खालीलप्रमाणे मंजुर करण्यात येतो.

२) वादीने मयत प्रतिवादी क्र. ७ किसन संभु वडवकर व त्यांचा मयत मुलगा नवनाथ किसन वडवकर व प्रतिवादी क्र. ८ मारुती संभु वडवकर यांचेअर्जात नमुद केलेले वारसदार यांना वादपत्रात सामील करावे व अर्जात नमुद केलेली दुरुस्ती वादीने पुढील तारखेपर्यंत करुन दुरुस्ती वादपत्र अभिलेखावर दाखल करावे.

RAMRAO BABURAO RAUT

Digitally signed by RAMRAO BABURAO RAUT
Date: 2025.12.12 18:19:34 +0530

(आर. बी. राऊत)
२रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
कर्जत, जि. अहमदनगर.

स्थळ : कर्जत.
दिनांक :१२/१२/२०२५.